# मराठी पुस्तके इंटरनेटवर वाचता येतात ही अभिमानास्पद बाब

**बुक-गंगा डॉट कॉमचा गौरव**

**महाकवी स्वातंत्र्यवीर वि.दा. सावरकर साहित्यनगरी :** मराठी पुस्तके इंटरनेटवर डाऊनलोड करुन वाचण्यासाठी उपलब्ध होतात ही अभिमानास्पद बाब आहे असे कौतुकोद्गार शिवसेना नेते खासदार संजय राऊत यांनी काढले. त्यांनी ग्रंथनगरीतील बुक गंगा डॉट कॉमच्या स्टॉलला भेट देवून या अनोख्या उपक्रमाची मुक्तकंठाने प्रशंसा केली.

यावेळी उध्दव ठाकरे यांच्या महाराष्ट्र देशा हे पुस्तकही जगभरात पोहचण्यासाठी इंटरनेटवर उपलब्ध व्हावे असा मनोदय बुक-गंगा डॉट कॉमचे संचालक मंदार जोगळेकर यांनी व्यक्त केला. खासदार संजय राऊत यांनी त्यांची उध्दव ठाकरे यांच्याशी संमेलनातच भेट घालून दिली. ग्लोबल मराठी वेबसाईटचे डायरेक्टर संजय पेठे आणि बुक गंगा डॉट कॉमचे संचालक मंदार जोगळेकर हे करत असलेल्या प्रयत्नांचे शिवसेना कार्यप्रमुख उध्दव ठाकरे यांनीही कौतुक केले. यावेळी भारतीय विद्यार्थी सेनेचे अध्यक्ष अभिजित पानसे हे देखील यावेळी उपस्थित होते.